**नियमीत दिवाणी मुकदमा नं. २४/२०१५ मधील निशाण नं. ३० वरील आदेश**

प्रस्तुतचा अर्ज हा प्रतिवादी तर्फे दाखल करण्यात आला असुन त्याने असे कथीत केले आहे की, सर्व्हे नं. १३२ हिस्सा नं. १(स.नं. ९ हि.नं.०) या जमिनीचे एकूण ७२ पोटहिस्से करण्यात आले व तशाप्रकारे ७२ स्वतंत्र सातबारा तयार करण्यात आले. वास्तविकत: सदर पोट हिश्श्यांचा भूमी अभिलेख दप्तरी आजरोजी वादीची विविक्षीत वहिवाट दर्शविणारा नकाशा अस्तित्वात आहे किंवा नाही हे दर्शविल्याशिवाय वादीचा दावा कायद्याने चालणार नाही. तसा नकाशा वादीने दाव्यासोबत जोडलेला नाही त्यामुळे दिवाणी प्रक्रिया संहितेच्या हुकूम ७ नियम ३ प्रमाणे या दाव्यास बाधा येत असल्याने त्याबाबतचा प्राथमिक मुद्दा काढून निर्णय दयावा अशी मागणी केलेली आहे.

२. या अर्जास निशाण ३५ येथे वादीने म्हणणे सादर केलेले असून त्याने प्रतिवादीच्या अर्जाचे खंडण केले आहे. त्याच्या मते वादीने दावा मिळकतीची संपुर्ण माहिती दिलेली आहे. त्याने प्रतिवादीच्या कैफियतमधील परिच्छेद क्र. २२ व २४ कडे लक्ष वेधले असुन प्रतिवादीने सर्व्हे नं. ९ हिस्सा नं. ५९ या मिळकतीबाबत असे नमूद केले आहे की जर सदर हिस्सा नं. ५९ चे स्थान निश्चीत करणे आवश्यक आहे तर त्याच अभिलेखावरुन सर्व्हे नं. ६० चे सीान निश्चीत करणे शक्य आहे. दिवाणी मुददम्यात वाद विषयक जमिनीचा नकाशा सादर करावा असा आदेश ७ नियम ३ मध्ये उल्लेख नाही असे त्याने नमूद केले आहे.

३. दोन्ही पक्षकारांचा युक्तीवाद ऐकला. एकंदरीत दाव्या अवलोकन केले असता प्रस्तुतचा दावा हा मनाईकरीता दाखल करण्यात आला आहे. आदेशिका आदेश ७ नियम ३ प्रमाणे नकाशा दाखल करण्यासाठीची तरतुद आहे त्या तरतुदीप्रमाणे अतिक्रमणाचा दावा दाखल करण्यासाठी वादीला नकाशा दाखल करणे अनिवार्य आहे. वादीने त्याच्या वादकथनात नमुद केल्याप्रमाणे दावा मिळकतीची परिस्थिती आहे का की प्रतिवादी म्हणतो त्याप्रमाणे दावा मिळकतीची परिस्थिती आहे ही गोष्ट पुरावा घेवून ठरवावी लागणार आहे. वादीला म्हणण्याप्रमाणे करायची असल्यास त्याला हे प्रस्तावित करायला लागेल की दावा मिळकत ही त्याचे ताब्यामध्ये आहे. त्याकरीता उपरोक्त नमुद केल्याप्रमाणे मुद्दा निश्चीत करुन पुरावा घ्यावा लागणार आहे. आतापर्यंत दाखल असलेल्या दोन्ही पक्षकारांच्या वादकथनांचा विचार केला असता वादीला त्याचा दावा शाबीत करण्यासाठी नकाशाची आवश्यकता लागणार आहे किंवा कसे ही गोष्ट पुरावा देत असताना सर्वस्वी वादीने ठरवायचे आहे. सबब मुद्दे निश्चीत झाल्या नंतर वादी त्याच्या आवश्यकतेनुसार जो काही पुरावा देईल या वरती दावा ठरणार आहे. सबब या क्षणाला प्रस्तुतच्या दाव्यामध्ये

अजुन मुद्दे निश्चीत झाले नाही. त्यामुळे प्रतिवादीने मागणी केल्याप्रमाणे दिवाणी प्रक्रिया संहित आदेश ७ नियम ३ बाबत प्राथमिक मुद्दा काढणे मला आवश्यक वाटत नाही. सबब मी खालील आदेश पारित करतो.

अर्ज नामंजूर करण्यात येतो.

सही/—

(वि.द.पाटील)

दिनांक— ०२/०२/२०१८

दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) वेंगुर्ला.